महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर -440 001
e-mail :-msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in


**परीक्षा प्राधान्य / महत्वाचे**

पत्र क्र. नाविमं/उमागो/प्रात्यक्षिक/३५५
नागपूर, दि. २४/०१/२०२५
२७

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
भंडारा/चंद्रपूर/नागपूर/वर्धा/गडचिरोली/गोंदिया.

विषय:— उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ. १२ वी) फेब्रु/मार्च २०२५ च्या प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत मूल्यमापन (Practical & Internal Exam ) परीक्षेचे ऑनलाईन पध्दतीने गुण भरणेबाबत

संदर्भ — १. राज्य मंडळाचे पत्र क्र. रा. मं /परिक्षा —२/१२० दि,०९/०१/२०२५.
२. राज्य मंडळाचे पत्र क्र.रा. मं./परिक्षा—७/१२१.दि. ०९/०१/२०२५.
३. राज्य मंडळाचे पत्र क्र.रा. मं./परिक्षा—२/३०१ दि. २२/०१/२०२५
४. पत्र क्रमांक नाविमं/उमागो/प्रात्यक्षिक/ १६२ नागपूर दिनांक १३/०१/२०२५

उपरोक्त संदर्भिय पत्रांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा (इ.१२वी) चे प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत (Practical & Internal Exam)मूल्यमापनाचे ऑनलाईन पध्दतीने गुण भरणेबाबतच्या सूचना संदर्भिय पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत. खालील दिलेल्या सूचनानुसार कार्यवाही करण्यात यावी.

१. फेब्रु,—मार्च २०२५ मधील इयत्ता १२वी प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत मूल्यमापन परिक्षेचे ऑनलाईन पध्दतीने गुण भरण्यासाठी "I.A.MARK" ही लिंक मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर दिनांक २४/०१/२०२५ ते दिनांक १८/०२/२०२५ या कालावधीमध्ये विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पाठविण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सदर गुण नोंदविताना त्याची पूर्णत: गोपनीयता राहील याची सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी दक्षता घ्यावी.

२. उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांकनिहाय ऑनलाईन पध्दतीने नोंदविलेल्या गुणांची Final Print Out घेवून त्यावर अंतर्गत व बहिस्थ परीक्षकांची स्वाक्षरी (आवश्यक त्या विषयाबाबत) व तोंडी, अंतर्गत मूल्यमापन, श्रेणी इ. गुणतक्त्यानुसार संबंधीत विषय शिक्षकांची स्वाक्षरी घेवून सदर गुण तक्त्यावर प्राचार्य/मुख्याध्यापक यांनी कनिष्ठ महाविद्यालय/उच्च माध्यमिक शाळेचा शिक्का उमटवून स्वाक्षरी करावयाची आहे. व सदरचे गुणतक्ते प्रचलित पध्दतीप्रमाणे सिलबंद पाकीटामध्ये, पाकीटावर उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव व सांकेतिक क्रमांक लिहून गुणतक्ते व साहित्य सोमवार, दि.२४/०२/२०२५ रोजी मंडळाच्या नियोजित संकलन केंद्रावर जमा करावयाचे आहे. सदर गुणतक्त्यांची एक प्रत उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात माहितीस्तव जतन करणे आवश्यक आहे.

३. उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे नाव, आईचे नाव व इतर दुरुस्त्या दि. १८/०२/२०२५ पर्यंत संदर्भिय पत्र क्रं.२. मधील सूचना क्रं. ५ नुसार विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने पाठवावयाच्या आहेत. यानंतर सदर दुरुस्त्यांसाठी ऑनलाईन लिंक उपलब्ध राहणार नाही.

४. अतिविलंब शुल्काच्या मुदतीमध्ये भरलेल्या व या Online System मध्ये ज्या विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक उपलब्ध झाले नाहीत अथवा विद्यार्थ्यांनी ऐनवेळी **विषय बदल** केला आहे. अशा सर्व विद्यार्थ्यांचे गुण प्रचलित पध्दतीने निर्धारित तारखेस विभागीय मंडळामध्ये जमा करावयाचे आहेत.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर

प्रतिलिपी,

१) मा. सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, शिवाजी नगर, पुणे—४ यांना माहितीस्तव समादराने अग्रेषित

२) मा. शिक्षण उपसंचालक नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीस्तव समादराने अग्रेषित

३) शिक्षणाधिकारी ( माध्यमिक ) जि. भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया यांना कळविण्यात येते की, आपल्या कार्यक्षेत्रातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा यांच्या लेखी निदर्शनास आणून दयावे.